# अस्तित्वाचे शोधसूत्र मांडणा-या अलीकडच्या कविता : एक चिकिसक अभ्यास

**प्रा.डॉ.शोभा रोकडे,** सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, इंदिराबाई मेघे महाविद्यालय, अमरावती.

**प्रस्तावना**

आधुनिक मराठी कवितेतील स्थित्यंतरे लक्षात घेता वेगवेगळया विचारप्रवाहाच्या जीवनानुभूतीच्या कविता मनोवेधक व मनस्पर्शी आहेत. समाजवास्तवाचे सूक्ष्म आकलन करणारी ही कविता कधी देशीयतेचे भान ठेवते, कधी महानगरीय जाणिवा प्रसरते, तर कधी मानवी भावबंध, नातेसंबंध आणि जगण्यातील पीळ अभिव्यक्त करते. कवितेचा अस्सलपणा, वास्तव आणि समकालिनत्व या आंतरिक मूल्यांमुळे अस्तित्वाच्या शोध घेणा-या कविता मोठया प्रमाणात लक्षणीय ठरल्या. या कवितांचा रुपबंध, आशय सूत्र आणि प्रभाव या अनुषगाने अभ्यासही मोठया प्रमाणात झाला. निरजा, अंजली कुलकर्णी, शैला सायनाकर, हेमा लेले, संजीवनी खोजे यासारख्या कवयित्रींचा प्रभाव एका विशिष्ट कालखंडावर आहे तर सुर्वे, ग्रेस, आरती प्रभू, ढसाळ, डहाके या कवीनंतर जीवनजाणिवांचा शोध घेणारे अरुण म्हात्रे, महेश केळूसकर, अजय कांडर, पी. विठ्ठल, केशव खटींग, अशोग बागवे, भगवान निळे या कवींनी कमालीचे अस्तित्वाच काव्यसौष्ठव सांभाळले.

कवितेच्या अर्थावर प्रकाश टाकल्यापेक्षा कवितेच्या निर्मितीवृत्तीवर प्रकाश टाकणे अधिक महत्वाचे या दृष्टीने विचार केल्यास नव्वदोत्तरी कवितांचे मोठेपण निश्चितच लक्षात घेण्यासारखे आहे. स्त्रीच्या भाव जीवना वरील कवितांनी कूस बदलून स्व अस्तित्वाची कविता याच काळात लिहिल्या गेली. प्रज्ञा दया पवार, नीलम माणगावे, मंदाकिनी पाटील, अस्मिता गुरव, सुनंदा शेंळके, उर्मिला चाकूरकर अशा कितीतरी कवियत्रींची मांदिमाळी सादर करता येईल. अनुभवनिष्ठ, वास्तवप्रगल्भतेची व परिपक्वतेची ही कविता आहे. या आधुनिक कवितांमधून मानवी अस्तित्वाचा शोध विविध रुपबंध, आकृतीतंत्र आणि आशय-अभिव्यक्तीतून कवींनी घेतला अस्तित्वशोधाची जाणीव शोधणे हा या शोधनिबंधाचा मुख्य हेतू आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. उपरोक्त कवींच्या कवितेचे समाजभान तपासणे.

२. या कवींच्या कवितेतील अस्तित्व जाणिवांचा शोध घेणे.

३. समकालीन वास्तवाच्या संदर्भात या कवितांच्या बीजमूल्यांची चिकित्सा करणे.

**'ठसे बदललेल्या मुक्कामावरुन'** हा विनायक येवले यांचा काव्यसंग्रह यादृष्टीने अत्यंत लक्षणीय आहे. संवेदनशील मनाची आत्मानुभूती या कवितेच्या केंद्रस्थानी असल्याने अनुभूतीच्या व्यामिश्र अशा अनुबंधातून ही कविता जन्म घेते. आशुतोष पाटील या संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात त्याप्रमाणे, स्वतःच्या जीवनजाणिवा आणि काव्यजाणिवा यांची ओळख पटवून घेण्यासाठी आजच्या नव्या कवीने सतत दक्ष असायला हवे, याप्रमाणे एक समंजस भान विनायक येवले यांना आहे.

तुम्ही पेरल्या इथल्या मातीत, भेदांच्या अफू बिया
छळवादी धर्माचे ओवळे सोवळे पांघरुन अन् केले काबीज आमच्या बंधुभावाने मळे.

काळया मातीचे अस्वस्थ वर्तमान या गणेश मरकड यांच्या काव्यसंग्रहाची नीवचं अस्तित्वाचं केंद्र शोधू पाहणारं आहे. काही बोलायचे आहे, काही सांगायचे आहे, ऐकेना कोणी तरी गा-हाणे मांडायचे आहे. हे सांगणे म्हणजेच माणसाच्या मनात असून भरलेले आहे. त्याला ओठावर ब्र उच्चारायचीही सोय नाही. व्यवस्थेमध्ये साध्या माणसाचा होणारा कोंडमारा आणि त्याचा गुदमरलेला श्वास याची नेमकी व्यथा मरकड आपल्या शब्दात पकडतात. जगताना आलेली विषारी अनुभवाची मालिका कवी कवितेतून उत्सुर्तपणे मांडतात. मानवी जगण्यातील भणंगता, उदविग्धंता ते अचूक टिपतात. विविध पातळयांवर होणारा कोंडमारा आणि न्याय हक्कासाठीचा आक्रोश त्यांची कविता मांडते. प्रकाशाचे कितीही पूंजके सोबतीला असतील तरी जीवनातील अंधार काही केल्या संपत नाही.

सुन्या सुन्या वाटा, हरवल्या दिशा, मुक्या मुक्या गोष्टी, हंबरल्या जशा

**'जाणिवांचे हिरवे कोंब'** हे लक्षवेधी शीर्षक असलेल्या यामिनी सातारकर, पांडे या कवयित्रीच्या कवितेची इतर शीर्षकेही अस्तित्वाच्या शोधाच्या जवळ जाणारी आहेत. तू शब्दांच्या अर्थासारखा, शोधत, दुःखाची जातकुळी, कवितेचे कच्चे खर्डे वाचताना, रेषा रेषांचा गुंता व्हावा. या शीर्षकामध्येच सारा संग्रह दडलाय. संवदेनांचे कोंब आजचया दगडी युगात किती दुर्मीळ झाले आहेत. अपेक्षांचे डोंगर विशाल झाल्याने कर्तव्याची भूमी सपाट झाली आहे. समाजामध्ये विकृतीचे आरेमाप संक्रमण झाले असून त्यात कोवळया भावविश्वाचे होरपळून निघणे कवयित्रीला अस्वस्थ करते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माणुसकीचा कोसळू पाहणारा जिव्हाळा कवयित्री आपल्या अंतःर्गत उर्मीनी पेलू पाहते पण काळोखाचे आभाळ आपली काळी छाया जराही दूर सारत नाही. सोसाटयाला वाराही एखादया तृप्तीच्या ढगाला पाझर फोडू शकत नाही. दुःखाची काजळगाणी खोल खोल हदयात झिरपत त्यातील खोल खोल ठिकाणांच्या आवर्तनात सुखाची बीज शोधू पाहतात. बोलक्या प्रतिमा आणि बीज शोधू पाहतात. बोलक्या प्रतिमा आणि हळवे वास्तव यांचा दुहेरी साज यायलेली ही कविता कवितेच्या भाउगर्दीतील एक वेगळा बाज असणारी कविता वाटते. आत्मीय आनंदाच्या शोधात भिरभिरणारी! स्त्री-पुरुष संदर्भातील अनेक दाखले कवयित्री देते. व्यवस्थेचा भेदभाव उघडकीस आणते.

माझेया अस्तित्वाचे संदर्भ तपासून पाहतांना उभे राहतात प्रश्न जाचक रुढी परंपराचे
अन् दाखवून देतात भेदभाव  एकाच समाजातील स्त्री पुरुषांसाठीचे

अजूनही जाचक रुढी परंपरांच्या विळख्यात गुंतून असलेलं स्त्री विश्व कवयित्रीच्या प्रवासातील मोठी अडचण आहे. हा प्रवास कवयित्रीचा एकटीचा नाही. तो संबंध स्त्री वर्गाचा आहे. स्त्री-पुरुष ही दरी स्त्री विश्वाचे बहरणे, फुलणे करपून टाकते ही खंतही कवयित्री व्यक्त करतात.

**काटयातून उडती पंख** हया अनोख्या शिर्षकाच्या कवितासंग्रहात अस्मिता जोगदंड यांनी महत्वपूर्ण काव्यलेखन केलेले आहे. मांडणी, निर्मिती या दृष्टीने अत्यंत आकर्षक असलेल्या हा संग्रह अंतरंगाचीही श्रीमंती सांभाळून आहे.

स्त्री दुःखाची सनंद कवयित्री या कवितेत मांडतात. आपल अस्तित्व संपवनं हा दुःखावरचा इलाज नाही तर शेवटी व्यवस्थेशी जुळवून घेणे आणि आपल्या जीवनाची नासाडी थांबविणे हेच अग्रकमाचे अशी समजंस भूमिकाही घेतात.

कसा आता आतापर्यन्त तुम्ही तग धरला
डोळे वाहतात रोज रोज  तरी ढग भरला

स्त्रियांच्या वाटयाला आलेला वेदनेचा रतीब काही केल्या मर्यादित होत नाही. तग धरुन तिचे जीणे महत्प्रयासाने सुरु असते. रोज अखंड अश्रू पाझरत असतात तरीही मनात ढग भरलेलाच अर्थात दुःखाची पातळी जराही कमी होत नाही. सांकेतिकता हा कवयित्रीच्या कवितेचा एक महत्वाचा पैलू आहे. या कवितेत स्वतःच असं एक स्वत्व आहे. सत्वशील झरा सबंध संग्रहात झुळझुळता दिसतो. प्रत्येक कवितेत कवयित्री ची चिंतनशील दृष्टी डोकावते. या चिंतनातून वाटयाला आलेल्या अवस्थेची समज त्या हळूवार पणे उलगडत जातात. समाजासमोर प्रश्न उभे करतात. अस्तित्वाचा झगडा लढतात, दाद मागतात आणि वाटयाला आलेल्या नकाराने निराशही होतात. या संग्रहातील प्रश्न ही स्वः अस्तित्व शोधाचाच आहे.

**सारांश** अलीकडच्या काळातील कवितेचे काव्यभानच अत्यंत वेगळया वौशिष्टयांनी परिपूर्ण आहे. जीवनाशी निगडित भावविश्व, सामाजिकतेची जाण, मांडणीतील अंतर्मुख या लक्षणांसह आलेली ही कविता संवदेना, भावना व विचार या तिन्ही पातळयांवर यशस्वी ठरलेली दिसते. सामर्थ्यशाली प्रतिमांची योजना हे या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. स्त्री मनाचे संवेदन, देशीयतेचे परिणाम, ग्रामीणतेचे दाह या कविता निष्णातपणे टिपतात. जगण्यातील साचलेपण, निराशा, दारिद्रय, दुःख यांचा आलेख या कविता मांडतात. अत्यंत संवेदनशील मनाच्या, आत्मानुभूतीच्या, दाहक, चिंतनशील अशा या कविता आहेत. वैयक्तिक जाणिवेतून सामाजिक जाणिवांना सामर्थ्यानिशी प्रकट करणा-या या कविता ज्या कवींच्या सिध्द हस्त लेखणीतून झिरपत्या झाल्या त्यात प्रामुख्याने विनायक येवले ठसे बदललेल्या मुक्कामावरुन अस्मिता जोगदंड काटयातून उडती पंख गणेश मरकड काळया मातीचे अस्वस्थ वर्तमान व योगिनी सातारकर जाणिवांचे हिरवे कोंब या काव्यसंग्रहांच्या अनुषंगाने मूळगामी विवेचन केलेले आहे. दिशाहिन झालेली आजची पिढी, माणसाची यांत्रिकता, विश्वासाची प्रतारणा, बदलत गेलेले सुखाचे संदर्भ, गावसंस्कृतीचा हलका झालेला पोत, अस्तित्वाची पोकळी या सा-या विषयांना स्पर्श करणा-या आपल्या स्वतंत्र शैलीचा बाज सांभाळत या कविता पुढे आल्या. म्हणून या कवींची कविता आत्मतेजाची कविता आहे. असे मला वाटते. एकूणच नव्वदोत्तरी कवितेत जे महत्वाचे कवी आहेत त्यात या कवींचे आणि या कवितेचे महत्वाचे स्थान आहे, हे निर्विवाद!

**संदर्भग्रंथ सूचि**

१. येवले विनायक, ठसे बदललेल्या मुक्कामावरुन, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम, दि.२४.१२.२०१४, कि.१२०
२. मरकड गणेश, काळया मातीचे अस्वस्थ वर्तमान,
३. जोगदंड अस्मिता - काटयातून उडती पंख, प्रतिमा पब्लिकेशन, पुणे, दि.१ मार्च २०१५, कि.११०
४. सातारकर योगिनी - जाणिवांचे हिरवे कोंब, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३ एप्रिल २०१५ कि.१२०
५. कवितारती - जाने फेब्रु-मार्च-२००८
६. अक्षरवैदर्भी - सप्टेंबर २००६.